महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022

दुरध्वनी क्रं. 0712-2959381 IN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/2467/2024-25 **दिनांक** :- 27/09/2024

## -:परिपत्रक:-

**विषय:- भटक्या जमाती क - प्रवर्गातील धनगर समाजातील युवक- युवतींकरीता संघ लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा पुर्व प्रशिक्षण- 2024-25 करीता घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षांचा निकाल जाहीर करण्याबाबत.**

सन 2024-25 या आर्थिक वर्षात महाज्योती, मार्फत राबविण्यात येणाऱ्या भटक्या जमाती क - प्रवर्गातील धनगर समाजातील युवक- युवतींकरीता संघ लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा पूर्व प्रशिक्षणांकरीता विद्यार्थ्यांची निवड करण्याकरीता चाळणी परीक्षा दि.17/08/2024 रोजी दोन शिफ्ट मध्ये घेण्यात आलेली आहे. घेण्यात आलेल्या चाळणी परीक्षांचा निकाल महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. तसेच यापुर्वी महाज्योतीच्या विविध योजनांचा लाभ घेतलेले व वयोमर्यादेमुळे सदर प्रशिक्षणाकरीता अपात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची यादीही यासोबत प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सदर प्रशिक्षणांकरीता प्रशिक्षण संस्था निवडण्याची प्रक्रिया ही स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण अंमलबजावणी व संनियंत्रण समिती मार्फत करण्यात येत आहे. परंतु महाज्योतीच्या संचालक मंडळाने सदर समितीच्या कामकाजाबाबत विविध तक्रारी उद्‌भवल्यामुळे याची दखल घेवून सदर प्रक्रियेमधुन बाहेर पडण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याची कार्यवाही करण्यासाठी शासनाकडे मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. सदर मार्गदर्शन प्राप्त झाल्यावर प्रशिक्षणाबाबत कार्यवाही करण्यात येईल. याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कोणत्या प्रशिक्षण संस्थेस रुजु व्हायचे आहे, याबाबत शासनाचे मार्गदर्शन प्राप्त झाल्यावर स्वतंत्रपणे परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.

**नोट-** 1. विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, निवड यादीत नाव असले तरी शासन निर्णय क्र.संकीर्ण-2019/प्र.क्र.3/विजाभज-1, दि.06/09/2019 नुसार पदवी परीक्षेत किमान 60% गुण प्राप्त विद्यार्थीच प्रवेश घेण्यास पात्र राहतील, याबाबत कागदपत्रांची प्रत्यक्ष पडताळणी प्रशिक्षण केंद्रावर करण्यात येईल.

2. **प्रशिक्षणाकरीता एकूण जागा**- संघ लोकसेवा आयोग- 103 व महाराष्ट्र लोकसेवा आयोग- 103

(स्वा.)
राजेश खवले
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर